# जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

**सिध्देश्वर पेठ, सोलापूर,**

**जिल्हा नियंत्रण कक्ष**

दूरध्वनी क्र.0217-2731012 फॅक्स : 0217-2621120 *Email ID–ddmo.rfsol-mh@gov.in*

जा.क्र. 2020/मशा/कार्या-4/जिनिक/प्र.क्र.-२८/आरआर-1638 दिनांक-23 /09/2020

**वाचले :-**

1. भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897
2. आपत्तीव्यवस्थापनकायदा, 2005 चेकलम 65(1)(ब)
3. मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र क्र.राआसोम /कोरोना विषाणू/मार्गसूचना/115292/2020 दिनांक 06 मार्च, 2020
4. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसुचना क्रमांक कोरोना-20208/प्र.क्र.58/ आरोग्य-5 दिनांक- 14 मार्च, 2020
5. केंद्रीय आरोग्य व कुटूंब मंत्रालय यांचे इमआर डिव्हीजनकडील सुचना दिनांक 07 एप्रिल, 2020
6. उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डूवाडी यांचेकडील पत्र क्र.जबाबी/कावि/2400/2020 दि. 21.09.2020.

---

**विषय :-** **<u>कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेकामी उपाययोजना</u>**
आधार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, कुर्डूवाडी ता.माढा. हे डेडीकेटेट कोवीड हेल्थ सेंटर साठी अधिग्रहण करणेबाबत.

## आदेश

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा ( कोव्हीड -१९ ) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ च्या खंड २,३ व ४ मधील तरतूदीनुसार दिनांक १४ मार्च २०२० रोजी अधिसूचना निर्गमित केलेले आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. तसेच दि. १४ मार्च २०२० च्या अधिसूचनेमध्ये नमूद नियम १० नुसार सदर नियमांची अंमलबजावणी करणेकामी जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी, सद्यस्थितीमध्ये कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्गरोखणेसाठी त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, वरील वाचले क्रमांक ६ नुसार उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डूवाडी यांनी कुर्डूवाडी येथील आधार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल माढा तालुक्याकरीता डेडीकेटेट कोवीड हेल्थ सेंटर (DCHC) साठी अधिग्रहण करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 मधील कलम 65 (1) (ब) नुसार आपत्ती कालावधीमध्ये बचाव कार्याच्या प्रयोजनार्थ जमीन इमारत किंवा इमारतीचा भाग अधिग्रहण करणेचा अधिकार अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना असल्याचे तरतूद आहे.

त्याअर्थी, मी मिलिंद शंभरकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर असा आदेश देतो की, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 मधील कलम 65 (1) (ब) नुसार तसेच वरील उपोद्धघातील मधील महाराष्ट्र कोव्हिड उपाययोजना नियम, 2020 नियम10-ए नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे संस्था डेडीकेटेड कोवीड हेल्थ सेंटर (DCHC) करीता अधिग्रहीत करीत आहे.

| अ.क्र | डॉक्टरांचे नाव व हॉस्पिटलचे नाव | एकुण खाटांची संख्या | आवश्यक सोई/सुविधा |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | डॉ.अभिजित नामदे, आधार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, कुर्डूवाडी ता.माढा. | 30 | No.of ICU Bed-10, No.of Physicion- 01, No.of Puls oxmiter-07, Infugen Pumps-07. |

त्यानुसार, तक्यामध्ये नमुद रूग्णालये / आस्थापना यांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव संपेपर्यत आपले रूग्णालय / संस्थेचे इमारत व परिसर तसेच रूग्णालयातील मनुष्यबळ व जीवरक्षक प्रणालीसाठी आवश्यक साधन सामग्रीचा ताबा जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर / जिल्हा आरोग्य अधिकारी, सोलापूर यांचेकडे देणेत यावा. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकामी सदरचा आदेश आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 अन्वये सर्व संबंधितांवर बंधनकारक राहिल.

**(मिलिंद शंभरकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर**

**प्रति,**

1) जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर
2) उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डूवाडी.
3) तहसिलदार माढा
4) मुख्याधिकारी, कुर्डूवाडी नगरपरिषद, कुर्डूवाडी
5) तालुका आरोग्य अधिकारी, माढा
6) डॉ.अभिजित नामदे, आधार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, कुर्डूवाडी ता.माढा.

**प्रत-**

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
2) अधिष्ठाता, वैश्यंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर
3) जिल्हा आरोग्य अधिकारी, सोलापूर